संशोधन आराखडा

नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास

(२०१०-११ ते २०२०-२१)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा गोषवारा

संशोधक

वागदकर रामदास पांडुरंग

मार्गदर्शक

प्रा. डॉ.एम.एन.बिरादार

प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर ता. भोकर जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड

२०२१

नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास

प्रस्तावना :

जगातील सर्व देशांमध्ये कमी अधिक प्रमाणात आदिवासी जमातीचे लोक आढळुन येतात. जगात सर्वात जास्त आदिवासी जमातीची लोकसंख्या आफ्रिका खंडात असून त्यानंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. विविध देशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. अमेरिकेत त्यांना 'रेड इंडियन' म्हणतात, ऑस्ट्रेलियात 'ॲबोरीजिन्स', आफ्रिका आणि आशियाई देश 'आदिवासी', तर युरोपियन देशांमध्ये 'जिप्सी' या नावाने ते परिचित आहेत. आदिम किंवा आदिवासी समाज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाला विचारवंत, अभ्यासक, प्रशासक, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते यांनी विविध नावे दिली आहेत. " रिसले, लॅस्सी, ग्रिगसन, सुबर्ण, सेडविक, मार्टिन, ए. व्हि. ठक्कर यांनी या लोकांना 'अगदी प्राचीन'(Aboriginal) किंवा 'अगदी मूळचे रहिवासी'(Aborigines) म्हटले आहे तर हटनने 'आदिम अगर आदिवासी'(Primitive Tribes) असे नामाभिधान केलेले आहे. डॉ. घुरये यांनी त्यांना 'तथाकथित मूळचे रहिवासी'(So-called Aboriginal) व 'मागासलेले हिंदू'(Backward Hindus) असे म्हटले. पण भारतीय राज्यघटनेत केलेला 'अनुसूचित जमात' (Schedule Tribes) हा उल्लेख डॉ. घुरये यांना मान्य आहे. डॉ. दासांनी आदिवासींचे वर्णन 'बुडत असलेली जमात'(Submerged Humanity) असे केले आहे." (१) गुरूनाथ नाडगोंडे, २०११

आदिवासी जमाती या भारताच्या सर्वच भागात कमी अधिक प्रमाणात आढळतात. विशिष्ट भूप्रदेश, प्रमाण लघुता, स्वत:ची बोलीभाषा पण लेखनकलेचा अभाव, वेगळी जीवन पद्धती, साधी अर्थव्यवस्था, सीमित तंत्रज्ञान, समान धर्म आणि सामाजिक एकजिनसीपणा ही आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये आहेत. आंध आदिवासी ही जमात महाराष्ट्र, तेलंगना, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ या राज्यात आढळते. महाराष्ट्र आणि तेलंगना राज्यात या जमातीची लोकसंख्या जास्त

असून मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि आंध्र प्रदेशात कमी आहे. महाराष्ट्रात आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या ४ लाख, ७४ हजार, ११० असून तिचे राज्यातील लोकसंख्येशी प्रमाण ५.७ टक्के एवढे आहे. महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचा विचार करता आंध जमातीचा क्रमांक सहावा लागतो. महाराष्ट्रात आंध आदिवासीची लोकसंख्या सर्वात जास्त आहे. या जमातीचे वास्तव्य मुख्यत: पैनगंगा नदीच्या खोऱ्यात असून त्यांची दाट वस्ती असणाऱ्या प्रदेशात वारंवार दुष्काळ पडत असल्याने त्यांना पोट भरण्यासाठी इतर जिल्ह्यात स्थलांतर करावे लागत आहे.

नांदेड जिल्हा महाराष्ट्राच्या इतिहासात सर्व परिचित असून प्राचीन वैभवशाली अशी ऐतिहासिक परंपरा या जिल्ह्याला लाभलेली आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेस आंध्रप्रदेश राज्यातील आदिलाबाद आणि निजामाबाद हे जिल्हे असून दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बिदर जिल्हा आहे. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस यवतमाळ आणि हिंगोली जिल्हे असून पश्चिमेस लातूर व परभणी जिल्हे आहेत. नांदेड जिल्ह्यात १६ तालुके आहेत तर त्या १६ तालुक्यातील एकूण गावाची संख्या साधारणत: १६०० ऐवढी आहे. नांदेड जिल्ह्यात आंध, गोंड, राजगोंड, भिल्ल, भिल्ल गरासिय, अराख, कोलाम,कोळी, धनगर कोळी या ९ आदिवासी जमाती आढळत असून त्यांची एकूण लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) २ लाख, ८१ हजार, ६९५ ऐवढी आहे. नांदेड जिल्ह्यातील हादगाव, किनवट, भोकर, माहूर, हिमायतनगर, मुदखेड आणि अर्धापूर या ७ तालुक्यांमध्ये आंध आदिवासी जमातीचे लोक वास्तव्य करीत असून आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनूसार) ९२ हजार, ६०८ एवढी आहे.

प्रादेशिक रचनेनुसार नांदेड जिल्ह्याचे अ)उत्तरेकडील डोंगराळ प्रदेश. ब) गोदावरी नदीच्या खोऱ्याचा प्रदेश. क) बालाघाट डोंगराच्या प्रदेश. असे ३ भाग पडतात. उत्तरेकडील डोंगराच्या प्रदेशात सातमाळा व निर्मळच डोंगर असून बालाघाट डोंगराच्या प्रदेशात मुदखेडच्या टेकड्या आहेत. या डोंगराळ प्रदेशात आंध आदिवासी

जमातीचे लोक आढळतात. आदिवासी समाजाच्या वैशिष्ट्यांच्या आधारे अनेक तज्ज्ञांनी त्यांच्या व्याख्या केल्या आहेत त्या पुढील प्रमाणे:

आदिवासी जमातीच्या व्याख्या :

१)गिलिन व गिलिन यांच्या मते:

"एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान जीवन जगणाऱ्या पण अक्षर ओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज असे म्हणतात."

२) डब्ल्यू. जे. पेरी यांच्यामते :

"समान बोलीभाषा बोलणाऱ्या व एकाच समान भूप्रदेशावर वास्तव करणाऱ्या समूहाला आदिम समाज किंवा आदिवासी असे म्हणतात."

३) डी. एन. मुजूमदार यांनी आदिवासीचे सर्व लक्षणे लक्षात घेऊन व्याख्या केली आहे.

"समान नाव असणारा, एकाच भूप्रदेशावर वास्तव करणारा, एकच भाषा बोलणारा व विवाह, व्यवसाय इत्यादी बाबतीत समान निषेध नियमांचे पालन करणारा व परस्पर उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने एक पद्धतशीर व्यवस्था स्वीकारणाऱ्या कुटुंबाचे किंवा कुटुंब समूहाचे एकत्रीकरण म्हणजे आदिवासी समाज होय."

४) मदन व मुजुमदार यांच्या मते:

"समान भाषा व समान संस्कृती असणाऱ्या व आर्थिक दृष्टीने परस्पर संबंधित असणाऱ्या ग्रामीण समुदायाच्या समुच्चयाचा उल्लेख आदिवासी समाज म्हणून नेहमी केला जातो".

वरील व्याख्यांच्या आधारे आदिवासी समुदायाचे इतर समाजापेक्षा असणारे वेगळेपण जाणवते.

आंध आदिवासी शेतकरी :

आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांची व्याख्या आपणास पुढिलप्रमाणे करता येते. 'अशी व्यक्ती जी स्वतः जमीन कसते, मेहनत करते किंवा काम करते अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश आंध आदिवासी शेतकरी या व्याख्येत करता येतो.' या जमातीचा व्यवसाय शेती व शेतमजुरी करणे हा आहे असे असले तरीही त्यांचा पूर्वीचा मुख्य व्यवसाय शिकार करणे, मच्छिमारी करणे आणि वनस्पती, कंदमुळे गोळा करणे व त्यावर उदरनिर्वाह करणे होता. शेतीप्रधान असलेली ही जमात आज शेती करत असली तरीही पूर्वी शिकार करणे किंवा स्थलांतरित शेती करुन जीवन जगत होती. या जमातीतील शेतकरी पारंपरिक पद्धतीनेच शेती करत असून त्यात थोड्याफार प्रमाणात बदल झाला आहे. या जमातीतील शेतकऱ्यांचे उत्पादन, रोजगार, तंत्रज्ञान, शासकीय योजनांचा लाभ, त्यांचे राहणीमान, आर्थिक स्थिती,सामाजिक स्थिती आणि शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने हे संशोधन हाती घेण्यात आले आहे.

समस्यासूत्रण :

महाराष्ट्र शासन आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत अनेक योजना राबवित असते. त्या आधारे त्यांची आर्थिक स्थिती सुधारून त्यांचे राहणीमान सुधारणे अपेक्षित आहे. पण त्यांच्या राहणीमानात पाहिजे तेवढी सुधारणा झाली का ? नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे का ? त्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे का ? त्यांनी त्यांच्या पारंपरिक पीक पद्धतीत

बदल केला आहे का ? त्यांनी त्यांच्या शेतीतील यंत्र सामुग्रीत बद्दल केला आहे का ? या सर्व प्रश्नाचा शोध घेणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे.

अध्ययन विषयाची निवड :

गरज ही शोधाची जननी आहे. कोणतेही संशोधन निश्चित हेतू डोळ्यासमोर ठेवून केले जाते व त्याची निर्मिती गरजेनुसार होते. विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करून राहणाऱ्या आदिवासीचे संपूर्ण जीवन ही निसर्गावर अवलंबून असते. आदिवासी समाजाचे क्षेत्र व्यापक असल्याने आदिवासी जमाती वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जातात. आदिवासी समाजात अनेक जमाती असून त्यापैकी आंध ही एक जमात आहे. नांदेड जिल्हयात आंध, गोंड, भिल्ल, भिल्ल गरासिय, आराख, कोलाम, या आदिवासी जमाती आहेत. या विविध जमातीतील आंध ही एक जमात आहे. आदिवासी जमातीतील शेतकऱ्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन अनेक योजना राबवित असते. त्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्चाची तरतूद केली जाते. पण प्रत्यक्ष आदिवासी शेतकऱ्यांना या योजनांची कितपत माहिती आहे आणि या योजनांचा प्रत्यक्ष लाभ आदिवासी शेतकऱ्यांना मिळत आहे का ? या योजनेच्या माध्यमातून अंध आदिवासी शेतकऱ्यांच्या स्थितीत संख्यात्मक आणि गुणात्मक बदल किती झाला आहे. याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्याच बरोबर आंध आदिवासी शेतकऱ्याचे दारिद्र्य, निरक्षरता, राहणीमान, आरोग्यविषयक सवयी इत्यादी मध्ये अपेक्षित बदल घडून येत आहेत का ? यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणून या सर्व घटकांचा सखोल अभ्यास करण्यासाठी 'नांदेड जिल्हयातील आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास' हा संशोधन विषय निवडला आहे.

संशोधन आराखडा :

संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती करण्यासाठी आणि संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन समस्येचा विचार पूर्वक अंदाज घेऊन त्या समस्येच्या आराखड्याचे स्वरूप निश्चित करावी लागते. प्रत्यक्ष संशोधन आराखडाचे विशेष महत्त्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश नांदेड जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे असल्याने वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा (Descriptive Research Design) अवलंब करण्यात आलेला आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकलनासाठी बहुतांशी व अंशतः संख्यात्मकदृष्ट्या अध्ययन केले आहे व त्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून निष्कर्ष काढले आहेत.

संशोधनाचे महत्त्व :

आर्थिकदृष्ट्या मागास आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र शासन अनेक योजना या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून राबवित असते. आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे ४ अप्पर आयुक्तालय असुन २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत मागासवर्गीय कल्याणाच्या राज्य व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी केली जाते.

शेतकऱ्यांना शेतीत नवीन तंत्रज्ञान, खते, बी-बियाणे, जलसिंचनाच्या सुविधा यांचा वापर करता येत नाही. शेतीतून कमी उत्पन्न मिळते, त्यामुळे कर्ज वाढते आणि त्यातून त्याची राहणीमानाची पातळी घसरते अशा प्रकारच्या एक ना अनेक समस्यांना शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीचा

अभ्यास करण्यासाठी हा संशोधन विषय निवडला आहे. या संशोधनाचे महत्त्व आदिवासी जमातीतील शेतकरी आणि त्याचबरोबर पुढे संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधकांसाठी देखील होणार आहे.

संशोधनाची उद्‌दिष्टे :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाला योग्य दिशा देण्यासाठी खालील उद्‌दिष्टे निश्चित केलेले आहेत.

१) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक समस्या जाणून घेणे.

३) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

४) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या जमिनीची उत्पादकता अभ्यासणे.

५) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या राहणीमान विषयक समस्यांचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनाची गृहीतके खालील प्रमाणे आहेत.

१) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांची कुटुंबे दारिद्र्यात जीवन जगत आहेत.

२) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळत नसल्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

३) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांना शासनामार्फत विविध योजनाचा लाभ मिळाल्याने शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत आहेत.

४) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होताना दिसून येत आहेत.

५) आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा होत आहेत.

संशोधन पद्धती:

"नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास" या विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तथ्थ संकलनासाठी प्राथमिक सामग्री आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येणार आहे.

तथ्थ संकलनाच्या पद्धती :

१) प्राथमिक पद्धत :

संशोधन विषयाच्या कार्याची योग्य माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार असून त्यामध्ये प्रश्नावली, मुलाखत, क्षेत्रभेट या साधनाचा वापर माहिती गोळा करण्यासाठी करण्यात येणार आहे.

२) दुय्यम पद्धत :

सदरील विषयाच्या संशोधन कार्याची माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून माहिती गोळा केली जाईल. यामध्ये शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, भारत सरकारचा जनगणना अहवाल, अप्रकाशित प्रबंध, संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

नमुना निवड :

“नांदेड जिल्हयातील आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास” या विषयाचा अभ्यास करण्यासाठी साधा सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. नांदेड जिल्हयात १६ तालुके असून त्यापैकी हादगाव, किनवट माहूर, भोकर, अर्धापूर, मुदखेड आणि हिमायतनगर या ७ तालुक्यांमध्ये आंध आदिवासी जमातीची लोकसंख्या आढळते. या ७ तालुक्यांमधून ८० गावांची निवड करण्यात येईल व प्रत्येक गावातून ५ आंध आदिवासी शेतकरी कुटुंबे यानुसार ४०० नमुना निवड करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही नांदेड जिल्हयातील हादगाव, किनवट माहूर, भोकर, अर्धापूर, मुदखेड आणि हिमायतनगर या ७ तालुक्यांपुरतीच राहील. नांदेड जिल्हयातील जास्तीत जास्त आदिवासी शेतकऱ्यांची संख्या असलेल्या गावांचा प्राधान्याने अभ्यास केला जाईल. आंध आदिवासी शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास त्यांचे राहणीमान, दारिद्र्य, पिक पद्धती, जलसिंचनाच्या सुविधा, विविध शासकीय योजना, नवीन तंत्रज्ञानाचा वापर या बाबींच्या आधारे करण्यात येणार असून ४०० कुटुंबावर आधारित असणारे हे संशोधन नांदेड जिल्हयातील त्या ७ तालुक्यापुरतेच मर्यादित राहतील.

संशोधनाचा कालखंड :

प्रस्तुत संशोधनाचा कालखंड २०१०-११ ते २०२०-२१ असा निश्चित करण्यात आला आहे.

प्रकरण सुची

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी प्रकरणाची मांडणी खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

१) प्रकरण पहिले : प्रस्तावना

विषय प्रवेशाच्या या प्रकरणात सदर विषयाच्या अनुषंगाने माहितीची अभ्यासात्मक पायाभरणी करण्यात येणार आहे.

२) प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

अभ्यासाचे हे दुसरे प्रकरण असल्याने यात यापूर्वी प्रकाशित झालेल्या साहित्याचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामुळे या प्रकरणात संशोधन विषयाची व्याप्ती व दिशा स्पष्ट होणार आहेत. त्या अनुषंगाने हे प्रकरण असणार आहे. तसेच संशोधनासाठी उपयुक्त असलेल्या संशोधन पद्धतीचा आढावा, उद्दिष्टे, गृहीतकृत्ये, संशोधन आराखडा, नमुना निवड व तथ्य संकलनाची पद्धती या आधारे ही संशोधनाचे विश्लेषण करण्यात येईल.

३) प्रकरण तिसरे : नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती

या प्रकरणात संशोधनातून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण, आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक आर्थिक समस्या, त्यांच्या जमिनीची उत्पादकता, तसेच राहणीमान विषयक समस्याचे विश्लेषण सदर प्रकरणात प्रश्नावलीच्या आधारे करण्यात येणार आहे.

४) प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा आढावा

सदर प्रकरणात नांदेड जिल्ह्यातील आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यासाठी लागू असलेल्या शासकीय योजना, त्यांचे लाभार्थी आणि लाभापासून वंचित शेतकऱ्यांचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच योजनानिहाय शेतकऱ्यांचा विकास व उपलब्धी या अनुषंगाने आढावा घेण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे : माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण

सदरील प्रकरणात प्राथमिक तथ्यांच्या अनुषंगाने अनुसूची मधून प्राप्त माहितीचे आलेख, सांख्यिकीय पद्धतीने विश्लेषण करण्यात येणार आहे.

६) प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारसी

या प्रकरणात आंध आदिवासी जमातीतील शेतकऱ्यांचा थोडक्यात आढावा घेऊन त्यांच्या समस्येची कारणमिमांसा करून विविध निष्कर्ष काढण्यात येतील. अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विविध उपाय प्रस्तुत संशोधन संशोधनात सुचवण्यात येतील.

- संदर्भसूची
- परिशिष्टे

संदर्भग्रंथ :

१) गुरूनाथ नाडगोंडे, भारतीय आदिवासी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०११

२) निर्मल भालेराव आणि देसाई, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे,२०१४

३) जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, २०२०

४) यशवंत चवरे, अनुसूचित जाती-जमातीचे कल्याण व संरक्षण कायदे आणि त्यांची अंमलबजावणी, मनोविकास प्रकाशन पुणे, २००९

५) राजेश धनजकर, आंध जमात शोध आणि बोध, अनुराधा पब्लिकेशन, नांदेड,२०१२

६) प्रदिप आगलावे, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर,२०००

७) आदिवासी विभागाची वेबसाईट www.mahtribal.gov.in

८) जिल्हयातची अधिकृत वेबसाईट- www.nanded.nic.in

९) महाराष्ट्र शासनाची वेबसाईट- www.maharashtra.gov.in

संशोधक **मार्गदर्शक**

वागदकर रामदास पांडुरंग प्रा. डॉ. एम. एन. बिरादार

प्राध्यापक व संशोधक मार्गदर्शक, अर्थशास्त्र विभाग

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड